# मोरे महीला महाविद्यालयाच्या विदयार्थीनींतर्फे दिपावलीनिमित्त आदिवासी पाडयावर भेटवस्तूंचे वाटप

गुरूवार दि. २४.१०.२०१९ रोजी एम.बी.मोरे कला वाणिज्य आणि विज्ञान महीला महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागामार्फत संभे येथील आदिवासी वाडीत दिपावलीनिमित्त भेटवस्तूंचे वाटप करण्यात आले.

दरवर्षीप्रमाणे महीला महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग आणि 'स्नेहवर्धिनी सामाजिक संस्था, वरसे' यांच्या सहयोगाने संभे येथील आदिवासी वाडीतील शाळेत स्वच्छता व रोगाच्या प्रतिबंधासाठी उपाय या विषयावर मुलांना आणि पालकवर्गाला माहीती देण्यात आली व दिपावलीनिमित्त विविध भेटवस्तूंचे वाटप करण्यात आले.

या कार्यक्रमास महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रम अधिकारी प्रा.मयुर पाखर, प्रा. प्रसन्न म्हसळकर, प्रा.दिपेश भोसले, राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेविका कु.दामिनी म्हसकर, कु.मनाली खैर व इतर ७० विद्यार्थीनी, तसेच स्नेहवर्धिनी सोशल ट्रस्टच्या सुपरवायजर सौ. सुप्रिया सुनिल झोलगे, आदिवासी पाडयावरील शाळेच्या शिक्षिका सौ.वैष्णवी रविंद सानप आणि संभे पाडयावरील ग्रामस्थ उपस्थित होते.




Scanned by CamScanner